-: निविदा :-

जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथील सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील जुने संगणक उपकरणे महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने प्रसिध्द केलेल्या शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-०७/प्र. क्र.८९/३९, दिनांक ०१ ऑगस्ट, २०११ मधील मार्गदर्शक तत्वास अधिन राहुन निर्लेखित करावयाचे आहे. त्यासाठी अधिकृत परवाना धारक साहित्य खरेदी करणा-याकडून दरपत्रके मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.

२. आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.

३. आपल्या फर्मच्या नावाने जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.

४. नमुद उपकरणाचे दरपत्रक सिलबंद पाकीटात देणे आवश्यक आहे.

५. सिलबंद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहीणे आवश्यक आहे.

६. सिलबंद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर असा पत्ता असणे आवश्यक आहे.

७. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाव्दारे या कार्यालयाच्या बारनिशि विभागाकडे आणुन दयावेत.

८. नमुद सोबत जोडलेल्या विवरण पत्रातील संगणक उपकरणाचा किमान आधारभुत किंमत रुपये ६५,०००/- ठेवण्यात आलेला आहे. सदर दरपत्रकामध्ये नमुद उपरकरणाचा किमान आधारभुत दरापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. अपुर्ण किंवा किमान रकमेपेक्षा कमी किंमतीचे दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आलेला आहे.

९. सदरहु दरपत्रक दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सांयकाळी ०६:०० वाजेपर्यंत देणे आवश्यक आहे.

१०. निविदा भरण्यापुर्वी ज्या फर्मला निर्लेखन संगणक उपकरणे पाहवयाचे असेल तर सदर उपकरणे दिनांक २०/०४/२०२६ व दिनांक २१/०४/२०२६ रोजी संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे उपलब्ध आहेत.

११. दरपत्रकाबाबत दबाव आणणाचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

१२. कोणतेही कारण न देता दरपत्रक अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

१३. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन जास्त दराचे असेल त्यांचेच दरपत्रक मंजूर करण्यात येईल.

१४. सर्व दरपत्रके सोमवार दिनांक ०४/०५/२०२६ रोजी मा. संगणक समन्वय समिती, जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांच्यासमोर उघडली जातील.

१५. ज्या फर्मची निविदा मंजूर केली जाईल त्यांनी त्वरित नमुद रक्कम लेखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांच्याकडे रोख स्वरुपात जमा करावी.

१६. ज्या फर्मची निविदा मंजूर केली जाईल त्यांनी निर्लेखित संगणक उपकरणे स्वखर्चाने त्वरित घेवुन जावे.

सदरचे दरपत्रक सोमवार दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर डी. एस. पी. चौक अहमदनगर येथे बारनिशी विभागात आणुन देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

अधिक्षक,
संगणक विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक :-१७/०४/२०२६

प्रत माहितीस्तव :-
१. मा. अधिक्षक, लेखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, अहमदनगर
२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
५. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई-कोर्ट वेबसाईट

निर्लेखित करावयाच्या संगणक उपकरणांचे विवरणपत्र

Sr. No.	Name of the Hardware Item	Total Quantity
1	Thin Client (including Key Board & Mouse)	194
2	Dot Matrix Printer	100
3	UPS	262
4	Keyboard	222
5	Mouse	132
6	Other faulty spare part (Scrap)	--